N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** पांढरकवडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0776 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/07/2024 20:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 13/07/2024
   **Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/07/2024
   **Time From (वेळेपासून):** 11:39 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/07/2024 **Time (वेळ):** 20:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/07/2024 20:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अण्णा भाऊ साठे चौक, पांढरकवड,केळापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री राजेश गजानन गाडगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बोरगाव,केळापुर,पांढरकवडा ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता . | बोरगाव,केळापुर,पांढरकवडा ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9765254540

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सफौ1590 प्रकाश बापुराव भगत | | | 1. जगदंबा ले-आउट पाढरकवडा , केळापुर,पांढरकवडा ,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/Informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 5000/ रुपये | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

कलम - 7 भष्ट्राचार प्रतिंबध अधिनीयम 1988
फिर्यादी - श्री राजेश गजानन गाडगे, वय 48 वर्षे, रा. बोरगाव ता.पांढरकवडा जि.यवतमाळ मो.क्र. 9765254540
आरोपी -सफौ/1590 श्री.प्रकाश बापुराव भगत, वय 57 वर्षे, रा.जगदंबा ले-आउट, संकटमोचन रोड, पांढरकवडा जि.यवतमाळ पदः- सहायक पोलीस उपनिरीक्षक, वर्ग 03
घटनास्थळ - पो.स्टे.पांढरकवडाच्या बाजुला अंण्णा भाऊ साठे चौक, पांढरकवडा ता.केळापुर जि.यतवमाळ
घटना ता.वेळ - दि. 13/07/2024 चे 11/39 वा. ते 12/02 वा दरम्यान
मिळाला माल - नगदी 5000/- रुपये
कायमी - ASI/675 संजय रामगडे पो.स्टे.पांढरकवडा
तपासी - मा. DYSP मंगेश मोहोड सा. ACB अमरावती
हकीकत - फिर्याद दि.13/07/2024 माझे नांव श्री राजेश गजानन गाडगे, वय 48 वर्षे, रा. बोरगाव ता. पांढरकवडा जि.यवतमाळ व्यवसाय - शेती मो.क्र. 9765254540 मी अँन्टी करप्शन ब्युरो यवतमाळ येथे प्रत्यक्ष हजर राहुन दि.11/07/2024 रोजी लेखी तक्रार दिली होती की, मी वर नमुद पत्त्यावर माझे परीवारासह राहत असुन शेती व्यवसाय करतो. माझे बोरगावला षेत असून माझेवर शेताचे वादामधून दि. 12/04/2024 रोजी पो. स्टे.पांढरकवडा जि.यवतमाळ येथे माझे विरुध्द अप क्र.431/24 कलम 294, 341, 506 नुसार गुन्हा दाखल झाला आहे. माझे वर गुन्हा दाखल झाल्याची माहिती मला मिळाल्या नंतर मी पो.स्टे.पांढरकवडा जि.यवतमाळ येथे गेलो असता. मला माहिती मिळाली की, माझे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाचा तपास हा सहा.पोलीस उपनिरिक्षक श्री.प्रकाश भगत पो.स्टे.पांढरकवडा जि.यवतमाळ यांचे कडे आहे. त्या वेळी मी त्यांना भेटलो असता त्यांनी मला म्हटले की, ''तुला या गुन्हयात अटक करत नाही, तपासात तुला मदत करतो. परंतु तुला त्या बदल्यात मला 5,000/- रु. दयावे लागतील. नाही तर तुला गुन्हयामध्ये अटक करणार तुझा पि.सि.आर. घेणार ते असे बोलल्या मुळे मला अटक होईल. माझी बदनामी होईल या भिती पोटी मी त्यांना पैसे देण्यासाठी हो म्हटले आणि तेथून निघून आलो. त्यानंतर दि.10/07/2024 रोजी मला श्री.भगत साहेबांचा त्यांचे मो.क्र.9420773865 वरुन मला माझा मोबाईल क्रमांक 9765254540 वर फोन आला आणि त्यांनी मला म्हटले की, ''तु पैसे दिले नाही अजून, पैसे आणून दे नाही तर तुला अटक करतो'' त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव हो म्हटले. परंतु मला पो. स्टे.पांढरकवडा येथील सह पोलीस उपनिरीक्षक श्री.प्रकाश भगत यांना लाच देण्याची ईच्छा नाही. तसेच माझा त्यांच्या सोबत व्यक्तीगत कुठलाही आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा कुठलेही भांडण नाही. त्या संबंधाने आज रोजी मी आपले कार्यालयात येवून तक्रार देत आहे. तरी त्यांचेवर कायदेशिर कारवाई व्हावी हि विनंती. अषी तक्रार मी दिल्यानंतर श्री. मोहोड साहेब यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ येथून दोन शासकीय पंच नामे 1) श्री.पवन दिगांबर कोंडावार वय 34 वर्षे, पद: कनिष्ठ लिपीक आणि 2) श्री. मोहन श्रीधर निस्ताने, पद: कनिष्ठ लिपीक, यांना बोलावून घेतले व आम्हा सर्वांना एकमेकांचा परिचय करुन दिला. त्यांनंतर दोन्ही पंचाची पंच म्हणुन काम करण्याची संमती घेतल्यानंतर, मी दोन्ही पंचाना माझ्या तक्रारीबाबत माहिती दिली. त्यानंतर श्री.मोहोड साहेब यांनी मला व पंचांना सांगितले की, आता आपण पोलीस स्टेशन पांढरकवडा जि.यवतमाळ येथे जावुन श्री. प्रकाश भगत यांची लाचेचे मागणी सबंधाने पडताळणी करणार आहोत. त्यांनतर आम्ही सर्वजन शासकीय वाहण क्र एमएच 27 ऐऐ 0082 आणि तक्रारदार याचे खाजगी वाहण एमएच 12 एचव्हि 0143 चे अँन्टी करप्षन कार्यालय यवतमाळ वरुन पांढरकवडा येथे आलो आणि पांढरकवडा ते नागपुर हायवे रोड वरील अकोली खुर्द गावाजवळील श्री महेंग चव्हाण यांचे धाब्यावर थांबलो. त्या ठिकाणा वरुन मी माझा मो.क्र 9765254540 वरुन श्री.प्रकाश भगत साहेबांचा यांचा मो.क्र.9420773865 वर फोन केला आणि कुठे आहे या बाबत विचारणा केली असता त्यांनी

मला सांगितले की, ते मा.उच्च न्यायालय नागपुर येथे आले आहे आणि त्यांना पांढरकवडा येथे येण्याकरीता रात्रीचे 10/11 वाजतील तेव्हा आपण उदया दि.12/07/2024 रोजी सकाळी 11/00 वाजता नंतर भेटु. त्यानंतर श्री मोहोड यांनी आम्हा सर्वांना गोपनियता राखण्याची सुचना देवुन पडताळणी कारवाई दि.12/07/2024 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दि.12/07/2024 रोजी आम्ही सर्वजन अंदाजे 11/30 वा चे सुमारास पांढरकवडा ते नागपुर हायवे रोड वरील अकोली खुर्द गावाजवळील श्री महेंग चव्हाण यांचे धाब्यवर भेटलो. मला आणि दोन्ही पंचांना पडताळणी पुर्व पंचणाम्यातील सुचनांची उजळणी करुन दिली आणि पोना शैलेश कडू यांनी माझे जवळ व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन दिले व मला पंच क्र.1 श्री.पवन दिगांबर कोंडावार याचे सह श्री.प्रकाश भगत याना भेटण्याकरीता पो.स्टे.पांढरकवडा जि.यवतमाळ येथे रवाना झालो. तीथे गेल्यानंतर मी आणि पंच क्र 01 असे आम्ही दोघे श्री प्रकाश भगत बसतात त्याठिकाणी गेलो असता मला ते त्या ठिकाणी दिसुन आले नाही. त्यामुळे मी त्यांना माझे मोबाईल वरुन कॉल केला असता श्री प्रकाश भगत यांचा मोबाईल बंद असल्याचे सांगत होते. मी पोलीस स्टेशन मधील उपस्थित कर्मचारी यांना श्री प्रकाश भगत याचे बद् दल विचारणा केली परंतु ते कोठे आहे याची माहीती न मिळाल्याने आणि त्यांचा मोबाईल बंद येत असल्याकारणाने मी आणि पंच 01 असे दोघेही सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर अंदाजे 15/00 वा चे सुमारास मी श्री प्रकाश भगत यांना परत कॉल केला असता त्याचे व माझे मोबाईल फोन वर संभाषण झाले आणि त्यांनी मला पोलीस स्टेशन पाढरकवडा येथे बोलावले. त्यानंतर श्री मोहोड याचे सुचनेवरुन पोना शैलेश कडू यांनी माझे जवळ व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन दिला व मला पंच क्र.1 श्री.पवन दिगांबर कोंडावार याचे सह श्री.प्रकाश भगत याना भेटण्याकरीता पो.स्टे.पांढरकवडा जि. यवतमाळ येथे रवाना केले. पो.स्टे.पांढरकवडा येथे पंच क्र 01 याचे समक्ष माझी व श्री प्रकाश भगत यांची भेट झाली. भेटीदरम्यान आमच्यात माझे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हा संबंधाने बोलणे झाले आणि त्यांनी मला म्हटले की, मी तुला गुन्हाच्या तपासात मदत करतो, तुल अटक करत नाही, असे बोलुन त्यांनी मला 5000 /- रुपयाच्या लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच क्र 01 सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकणी आलो व पोना शैलेश कडू यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर बंद केला आणि पो.स्टे.पांढरकवडा येथे गेल्यानंतर काय घडले या बाबत मला आणि पंच क्र 01 यांना विचारण केली असता मी व पंच क्र 01 यांनी घडलेली हकीकत त्यांना सांगितली. त्यानंतर श्री मोहोड यांनी माझे व श्री प्रकाश भगत यांचे दरम्यान व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकविले, आम्ही सर्वांनी ते संभाषण ऐकल्यानंतर आम्हा सर्वांची खात्री झाली की, आलोसे श्री प्रकाश भगत यांनी मला, माझे विरुध्द पो.स्टे.पांढरकवडा जि.यवतमाळ येथे दाखल असलेल्य गुन्हात मला अटक न करण्याकरीता, तपासात मदत करण्याकरीता मला पंच क्रमांक 01 यांच्या समक्ष 5000/-रूपये लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर श्री मोहोड यांनी मला लाचेची रक्कम हजर करण्यास सांगीतले असता मी 500 रूपये दराच्या 10 नोटा हजर केल्या. त्या नोटांचे क्रमांक लिहून घेवून पंचासमक्ष सदर नोटांना पावडर लावण्यात येवून प्रात्यक्षिक करुन दाखविले. लाचेची रक्कम माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. मला व पंचांना सुचना दिल्या. त्यानंतर मी माझा मो. क्र 9765254540 वरुन श्री.प्रकाश भगत साहेबांचा यांचा मो.क्र.9420773865 वर फोन केला आणि पैसे घेवुन कोठे येवु, असे विचारले असता त्यांनी मला बिरसा मुंडा चैक, पांढरकवडा येथे येण्यास सांगितले. त्यानंतर श्री मोहोड याचे सुचने वरुन पोना शैलेश कडू यांनी माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन दिले व मला पंच क्र.1 श्री. पवन दिगांबर कोंडावार याचे सह श्री.प्रकाश भगत याना लाचेची रक्कम देण्याकरीता माझे चार चाकी वाहाणाने रवाना झालो सापळा पथकातील अधिकारी शासकीय वाहणाने आमचे मागे आले. बिरसा मुंडा चौकात आल्यानंतर मी माझी चार चाकी वाहण पार्क केले आणि मी व पंच क्र 01 आनंद अमृततुल्य चहा कॉफी या दुकानात थांबुन राहीलो काही वेळाने श्री प्रकाश भगत आणि एक पोलीस कर्मचारी त्या ठिकाणी आले. तेव्हा श्री प्रकाश भगत आणि माझे बोलणे झाले परंतु त्या ठिकाणी श्री प्रकाश भगत यांनी माझे कडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्याठिकाणी त्यांनी मला म्हटले की, तुम्ही उदया जमानतदार घेवुन सकाळी 11/00 नंतर पोलीस स्टेशनला या आणि मी जर बोरगावला आलो तर मी तुम्हाला तुमच्या घरी येवुन भेटतो. त्यानंतर ते दोघे ही त्या ठिकाणावरुन निघुन गेले. वरील सर्व कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर श्री प्रकाश भगत यांनी मला कॉल पण केला नाही आणि ते माझे गावाला घरी पण आले नाही. दि. 13/07/2024 रोजी सकाळी 10/45 वा चे सुमारास आम्ही सर्व जण पांढरकवडा ते नागपुर हायवे रोड वरील अकोली खुर्द गावाजवळील श्री महेंग चव्हाण यांचे धाब्यावर भेटलो त्या ठिकाणावरुन मी माझा मो.क्र 9765254540 वरुन श्री.प्रकाश भगत साहेबांचा यांचा मो.क्र.9420773865 वर फोन केला कोठे येवु असे विचारले असता त्यांनी मला सांगितले की, तुम्ही पोलीस स्टेशनच्या समोर या. त्यानंतर मला आणि पंचाना सापळा पुर्व पंचनाम्यातील सुचनांची उजळणी करुन दिली लाचेची रक्कम माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर श्री मोहोड याचे सुचने वरुन पोना शैलेश कडू यांनी माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन दिले व मला पंच क्र.1 श्री.पवन दिगांबर कोंडावार याचे सह श्री.प्रकाश भगत याना लाचेची रक्कम देण्याकरीता

पो.स्टे.पांढरकवडा येथे माझे चार चाकी वाहाणाने रवाना झालो सापळा पथकातील अधिकारी शासकीय वाहणाने आमचे मागे होते. पो.स्टे.पाढरकवडा च्या समोर आल्यानंतर मी माझी चार चाकी वाहण पो.स्टे.पांढरकवडाच्या बाजुला अंण्णा भाऊ साठे चौक, पांढरकवडा येथे पार्क केले. त्याच परीसरात सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी आपआपल्या परीने दबा धरुन बसले. मी माझा मो.क्र 9765254540 वरुन श्री.प्रकाश भगत साहेबांचा यांचा मो. क्र.9420773865 वर फोन केला आणि पो.स्टे.पांढरकवडाच्या समोर आलो असल्याचे त्यांना सांगितले त्या नंतर काही वेळाने श्री प्रकाश भगत हे पोलीस गणवेशात त्या ठिकाणी आले. आणि ते माझी चार चाकी वाहण क्र. एमएच 12 एचव्हि 0143 च्या समोरील चालकाच्या सिट च्या बाजुला असलेल्या सिटवर बसले. मी माझे वाहणाच्या चालकाच्या सिट वर बसलो. त्या ठिकाणी त्याचे आणि माझे परत माझे कामाच्या अनुषंगाने बोलणे झाले आणि त्यांनी मागणी केल्यानंतर मी लाचेची रक्कम काढुन त्याचे समक्ष धरल्यानंतर त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन त्याचे जवळ असलेल्या कागदा मध्ये ठेवली. त्यानंतर लगेचच मी वाहणाच्या बाहेर येवुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केल्यावरून सापळा पथक त्या ठिकाणी आले व त्यांनी आलोसे श्री प्रकाश बापुराव भगत यांना आपली ओळख सांगितली व लाचेची रक्कम पंचासमक्ष हस्तगत केली आणि पंचनाम्या प्रमाणे सविस्तर कारवाई केली. अशाप्रकारे मी दिनांक 11/07/2024 रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.12/07/2024 रोजी करण्यात आलेल्या कारवाई दरम्यान माझे विरुध्द पो.स्टे.पांढरकवडा जि.यवतमाळ येथे दाखल असलेल्या अपराध क्र 431/2024 कलम 341,294, 506 भादवि च्या गुन्हात मला अटक न करण्याकरीता आणि तपासात मदत करण्याकरीता लाच रक्कम 5000/- रुपये मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. तसेच दि.13/07/2024 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लाचेची रक्कम 5000/- रुपये घेतांना पंच क्र 01 याचे समक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तरी आरोपी लोकसेवक श्री.प्रकाश बापुराव भगत, वय 57 वर्षे, रा.जगदंबा ले-आउट, संकटमोचन रोड, पांढरकवडा जि.यवतमाळ पदः- सहायक पोलीस उपनिरीक्षक, वर्ग 03 यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई होणेकरीता मी फिर्याद देत आहे. माझी वरील नमुदप्रमाणे फिर्याद संगणकावर टाईप केली असुन मला वाचुन दाखविली, घडलेल्या घटनाक्रमानुसार बरोबर व खरी आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
DEVENDRA Devidasrao MESHKAR
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** POBN55810
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** DINESH VITHALRAO
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN84058

ठाणे अमलदार
पो. स्टे. पांढरकवडा
जि. यवतमाळ

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)